अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

साप पकडल्यानंतर दंश झाल्याने तरुणाचा मृत्यू

सोलापूर : घराजवळ फिरताना साप निघाला. त्याला पकडल्यानंतर अचानक सापाने हाताला दंश केल्याने विवाहित तरुण मरण पावला. ही घटना मुळेगाव रोडवरील मंत्री चंडक नगरात काल बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली. सचिन किसन ननवरे (वय ३० राहणार मंत्रीचंडक नगर, मुळेगाव रोड) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. काल रात्री १० वाजता तो घराजवळ फिरत होता. त्यावेळी त्याची नजर सापावर पडली. तेंव्हा त्याने सापाची शेपटी पकडून त्याला सोडण्यासाठी निघाला होता. अचानक सापाने त्याच्या डाव्या हाताला दंश केला. त्याला शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो गुरुवारी सकाळी मरण पावला. मयत सचिन ननवरे हा विवाहित असून तो एमआयडीसी येथील कारखान्यात कामगार होता. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. २३ सप्टेंबर २०२२ ▸ वर्ष : २० वे ▸ अंक : ३५४ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

अनैतिक संबंधाला केला अडथळा, बायकोनेच नवऱ्याचा चिरला गळा

- काळोखात केलेल्या पापाचा छडा लागला,
- प्रियकरासोबत पळून जाण्याचा प्लॅन फसला
- गंगाई केकडे नगरातील हत्येचे गूढ उलगडले

सुराज्य/सोलापूर

सोलापुरात खळबळ माजवलेल्या गंगाई केकडे नगरातील एका इसमाच्या हत्येचा तपास लावण्यात पोलिसांना यश आले असून पत्नीनेच आपल्या प्रियकराच्या मदतीने नवऱ्याचा गळा चिरल्याचा अमानुष प्रकार तपासात उघड झाला आहे. पत्नीचे एका व्यक्तीसोबत अनैतिक संबंध होते. त्याला नवऱ्याने विरोध केला होता. हा अडसर पत्नीला सहन झाला नाही. त्यामुळे प्रियकराची मदत घेऊन तिने आपल्या नवऱ्यालाच संपवून टाकले. बुधवारी पहाटेच्यावेळी या दोघांनी मिळून घरातच तीक्ष्ण शस्त्राने सपासप वार करून नवऱ्याला संपवले. पण आपल्या पतीला कुणीतरी मारून टाकल्याचा बहाणा करून पत्नीने साळसूदपणा दाखवला होता.मात्र, पोलिसांनी खाक्या दाखवताच पत्नी व प्रियकराने सारी कबुली पोलिसांपुढे दिली.त्या दोघांना पोलिसांनी अटक केल्याने प्रेयसी व प्रियकर यांचा पळून जाण्याचा प्लॅन फसला.

या प्रकरणात पोलिसांनी मयत दशरथ नारायणकर यांची पत्नी अरुणा दशरथ नारायणकर (वय २९ रा.गंगाई केकडे नगर, जुना विडी घरकुल सोलापूर) आणि तिचा प्रियकर बाबासाहेब जालिंदर बाळशंकर (वय २७ रा. डोंबर जवळगा ता.अक्कलकोट) या दोघांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या. त्यांना ५ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने गुरुवारी दिला. २४ तासाच्या आत गुन्हे शाखेच्या पथकाने हा गुन्हा उघडकीस आणला. बुधवारी पहाटेच्या सुमारास गंगाई केकडे नगरात अरुण दशरथ नारायणकर या इसमाचा राहत्या घरात तीक्ष्ण शस्त्राने गळा कापून खून झाला होता. या घटनेची फिर्याद त्यांची पत्नी अरुणा नारायणकर हिने अनोळखी इसमाविरुद्ध एमआयडीसी पोलिसात दिली होती. आपल्या पतीचा अनोळखी इसमाने गळा चिरून खून केला. आरोपीला पकडताना त्याने आपल्या हाताला चावा घेऊन झटापट करीत पसार झाला. अशी पोलिसात खोटी फिर्याद देणाऱ्या पत्नीनेच कट रचून आपल्या प्रियकरासोबत पतीचा खून केला. अनैतिक संबंधात पती अडथळा ठरत असल्याने हा खून झाल्याचे तपासात निष्पन्न झाले.

मयत दशरथ नारायणकर

पत्नी अरुणा नारायणकर

प्रियकर बाळशंकर

या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेच्या पोलिसांनी केला. मयत दशरथ नारायणकर आणि त्याची पत्नी अरुणा हे दोघे सोलापुरात येण्यापूर्वी डोंबर जवळगा येथे राहण्यास होते. तीन महिन्यापूर्वी ते सोलापुरात स्थायिक झाले होते. त्याप्रमाणे पोलिसांनी डोंबरजवळगा येथे जाऊन चौकशी केली असता तेथे राहणाऱ्या बाबासाहेब बाळशंकर आणि अरुणा नारायणकर हिचे गेल्या सात ते आठ वर्षांपासून प्रेम संबंध असल्याचे समजले. आरोपी बाळशंकर हा मोबाईल बंद ठेवून घरातून गायब झाल्याने पोलिसाचा संशय आणखी बळावला. त्याला बुधवारी रात्रीच्या सुमारास पोलिसांनी मुळेगाव क्रॉस रोडवर ताब्यात घेतले. त्यानंतर संपूर्ण प्रकरणाचा छडा लागला. पोलीस उपायुक्त बापू बांगर, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रीती टिपरे याच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे व पोलीस निरीक्षक सुनील दोरगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय शिरसागर, संदीप पाटील, महेश शिंदे, निळोफर तांबोळी, कृष्णात कोळी, राजू मुदगल, कुमार शेळके, महाडिक यांनी हा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी महत्त्वपूर्ण अशी कामगिरी बजावली.

दोघांचा पळून जाण्याचा प्लॅन फसला

खून केल्यानंतर अरुणा व तिचा प्रियकर बाबासाहेब दोघे पळून जाणार होते. खून केल्यानंतर बाबासाहेब हा डोंबर जवळगा (ता.अक्कलकोट) येथे गेला होता.२१ सप्टेंबर रोजी रात्रीच्या सुमारास तो मुळेगाव क्रॉस रोडवर गुन्हे शाखच्या जाळ्यात अडकला. आणि त्याने गुन्हाची कबुली दिली आणि पळून जाण्याचा प्लॅन फसला.

व्हाट्सअपवर झाली चॅटिंग अन् मारण्याची लावली फिल्डिंग

या गुन्ह्यातील आरोपी बाबासाहेब बाळशंकर हा विवाहित असून तो ड्रायव्हर म्हणून काम करित होता. गेल्या सात ते आठ वर्षांपासून त्याचे अरूणावर प्रेम होते. त्याने आपल्या छातीवर अरुणा हे नाव गोंदवले होते.तसेच दोघांमध्ये व्हाट्सअपवर झालेली चॅटिंग आणि कट रचून कसे मारायचे हा संवाद आढळला आहे. गोळा करण्यात आलेल्या वस्तू,या सर्व पूर्व नियोजित कटाचा भाग असल्याने दोघांना अटक केली असून २६ पर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.

- सुनील दोरगे (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा)

राष्ट्रवादीच्या शहराध्यक्षपदी सुधीर खरटमल मिशन कार्पोरेशनसाठी उर्जावान चेहरा

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

बहूचर्चित सोलापूर शहर राष्ट्रवादी कांग्रेसच्या अध्यक्षपदी 'उर्जावान' नेते सुधीर खरटमल यांची निवड निश्चित करण्यात आली असून या निवडीची केवळ औपचारिक घोषणा बाकी राहिली आहे.



विशेषत्वे, सोलापूर महापालिकेवर सत्ता आणण्यासाठी राष्ट्रवादीकडून 'मिशन कार्पोरेशन' मोहीम राबवली जाणार आहे. या महापालिकेवर कोणत्याही परिस्थितीत राष्ट्रवादीचा झेंडा फडकावलाच हवा, असा मनसुबा या पक्षाचे गॉडफादर शरद पवार तसेच पक्षातील वजनदार नेते अजित पवार यांचा आहे.

या पार्श्वभूमीवर, पॉवरबाज नेता म्हणून खरटमलांची या पदी नियुक्ती करण्याचे खुद्द शरद पवार आणि अजित पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी निश्चित केल्याची माहिती आहे. मागील ४० वर्षे काँग्रेसमध्ये राहून संघटनात्मक बांधणीचे मुख्य धडाकेबाज काम करण्याबरोबरच, लोकसभा, विधानसभा, विधान परिषद तसेच सोलापूर महापालिका या सर्व निवडणुकांसाठी खरटमल यांनी आजवर भरीव काम केले आहे, या आयाड्यांवरचा प्रदीर्घ अनुभव त्यांना आहे. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या लोकसभेच्या दोन निवडणुका वगळता उर्वरित सर्व निवडणुकांमध्ये खरटमल यांचा 'वजनदार' नेते म्हणून सहभाग राहिलेला आहे.

शिवाय या पक्षातील 'कुबेर' म्हणून त्यांची ख्याती आहे. प्रत्येक घटकाला मदत करण्यात मशहूर असलेल्या खरटमल यांना मानणारी सोलापूर शहरात प्रत्येक भागात कार्यकर्त्यांची फळी आहे. हे सर्व लक्षात येता, मुख्य सोलापूर महापालिकेसह अन्य निवडणुकांमध्ये नेतृत्व करण्याबरोबरच, या शहरात राष्ट्रवादीची जोरकस मोर्चेबांधणी करण्यासाठी तसेच राष्ट्रवादीमधील सर्वांना एका सुत्रात बांधून इप्सित साध्य करण्यासाठी सर्वसमावेश चेहरा म्हणून खरटमल यांची नियुक्ती निश्चित करण्यात आली आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे राष्ट्रवादीचे परवा दिल्लीत राष्ट्रीय अधिवेशन झाले, या अधिवेशनाला सोलापूर शहराचे अध्यक्ष म्हणून उपस्थित रहावे असा निरोप त्यांना प्रदेश राष्ट्रवादीकडून आला होता. त्यानुसार, ते उपस्थितही राहिले होते. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत सोलापुरात जंगी कार्यक्रम घेऊन खरटमल यांना हे पद बहाल करण्याचे निश्चित करण्यात आले होते. मात्र राज्यात सत्तांतर झाले. त्यात खरटमल यांचा कार्यक्रम स्थगित राहिला अशीदेखील माहिती मिळाली. शहराध्यक्ष पदाची जबाबदारी स्वीकारल्याचे मानून शहरात काम चालू ठेवावे असे देखील खरटमल यांना सूचित करण्यात आल्याची माहिती मिळाली.

खरटमल म्हणाले, मी राष्ट्रवादीचाच शिलेदार

राष्ट्रवादीचा मी शिलेदार आहे, या पक्षात मी आता पूर्णपणे रमलो आहे, मी आता या पक्षातच राहून इतंदेखील भारतीय कांग्रेसप्रमाणं तनमनधनानं काम करणार आहे, कार्यकर्त्यांनी याची दखल घ्यावी असं आवाहन पूर्वाश्रमीचे कांग्रेसचे आणि सध्याचे राष्ट्रवादीचे नेते सुधीर खरटल यांनी 'सुराज्य' ला सांगितलं.

कचरा विलगीकरणाचा भुवनेश्वर पॅटर्न सोलापुरात राबवण्याचा मानस

नागरिकांना स्क्रॅच कार्डद्वारे लाभांश देण्याची योजना : पी.शिवशंकर

सोलापूर : भुवनेश्वर पालिकेच्या धर्तीवर सोलापूर शहरातही ओला व सुका कचरा विलगीकरण करण्यास प्रोत्साहन देत नागरिकांना स्क्रॅच कार्डद्वारे लाभांश देण्याची योजना प्रायोगिक तत्त्वावर राबवता येईल का ? याची चाचपणी सुरू असल्याची माहिती महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी दिली.

केंद्र सरकारच्या शहरी कार्य मंत्रालयाच्यावतीने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शून्य कचरा' मोहीम यशस्वी होण्यासाठी स्वच्छता स्टार्टअप चॅलेंज ही स्पर्धा दिल्ली येथे घेण्यात आली होती. त्यामध्ये देशातील खासगी संस्थांनी वेगवेगळ्या प्रयोगातून तयार केलेले ३० पेक्षा अधिक प्रकल्प यावेळी सादर करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी महापालिका आयुक्त पी शिवशंकर हे उपस्थित होते. या कार्यशाळेची माहिती महापालिका आयुक्तांनी पत्रकारांना सांगितली. भुवनेश्वर महापालिकेने दिल्ली येथील कार्यशाळेत हा प्रकल्प सादर केला होता. त्यामध्ये ओला व सुका कचरा वेगळा करून दिला तर नागरिकांना तिथे स्क्रॅच कार्डद्वारे लाभांश दिला जातो. यामुळे कचरा विलगीकरणाला प्रोत्साहन मिळते.अगदी त्याच धर्तीवर सोलापूर शहरातील नागरिकांसाठी स्क्रॅच कार्ड लाभांश योजना राबवता येईल का याचा विचार सुरू आहे. त्या संदर्भात नेमकं काय लाभांश देता येईल, याची चाचणी सुरू आहे. त्यासाठी बायो एनर्जी कंपनीच्या अधिकाऱ्यांसमवेत लवकरच बैठक घेऊन निर्णय घेण्यात येणार असल्याचे महापालिका आयुक्तांनी स्पष्ट केले आहे. तसेच राजस्थान येथील शिकर नगरपालिकेने ओला व सुका कचरा १०० टक्के विलगीकरणाचा प्रयोग यशस्वी केला आहे. त्याची कशी अंमलबजावणी केली. याचेही प्रात्यक्षिक त्या ठिकाणी पाहता आले असे आयुक्तांनी सांगितले.

कार्यशाळेतून अनेक उपयुक्त माहिती मिळाली

कचरा विलगीकरणाचे फायदे, घरोघरी कशाप्रकारे कचरा संकलन केला जातो, त्या माध्यमातून खत निर्मिती, टाकाऊतून टिकाऊ कशा पद्धतीने निर्मिती केली जाते. यासह अनेक उपयुक्त माहिती कार्यशाळेतून मिळाल्याचे पालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी सांगितले.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

दुसरी रेषा मोठी पण नाय करत, अन् हाय ते पण!!

कल्याण
689-30-136

मेन बाजार
239-48-134

लक्ष्मी बँकेने अखेर 'मान' टाकली; आरबीआयकडून परवाना रद्द

सुराज्य/सोलापूर

सोलापूरच्या सहकारी बँकिंग क्षेत्रात वैभव प्राप्त केलेल्या श्री लक्ष्मी सहकारी बँकेचा परवाना भारतीय रिझर्व्ह बँक अर्थात आरबीआयकडून रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे बँकेला आता टाळे लागणार आहे. रिझर्व्ह बँकेच्या या कारवाईमुळे सोलापूरच्या बँकिंग क्षेत्रात खळबळ उडाली आहे. सोलापूरच्या इतिहासात अशी कारवाई पहिल्यांदाच झाली आहे.

परवाना रद्द केल्यामुळे ही बँक कुठल्या बँकेत मर्ज करणार? शहर व जिल्ह्यातील शाखांमध्ये जे अधिकारी व कर्मचारी आहेत, त्यांचे काय करणार? आणि ठेवीदारांच्या रकमांचे काय करणार? हे यक्षप्रश्न समोर आले आहेत. थकबाकींच्या खाईत गेलेल्या बँका अन्य बँका घ्यायला तयार नसतात, हा आतापर्यंतचा अनुभव आहे पण आरबीआय लक्ष्मी बँकेचे भवितव्य कशाप्रकारे ठरवणार? कोणता मार्ग अनुसरणार याकडे बँकिंग क्षेत्राचे लक्ष लागून आहे.

बँकेचे ठेवीदार ५ लाख रुपयांपर्यंतच्या रकमेवर दावा करू शकतात, असे आरबीआयकडून सांगण्यात आले आहे. अशा स्थितीत हा एक मोठा दिलासा म्हणता येईल.

स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या या बँकेने सोलापूरच्या बँकिंग क्षेत्रात लौकिक प्राप्त केलेला होता. पारदर्शक व काटकसरीच्या कारभाराने लक्ष्मी बँकेने स्वतःची ख्याती निर्माण

केली होती. शतकी मार्गावर असलेल्या या बँकेला एकाएकी दृष्ट लागली आणि गतवर्षी बँकेचे खरे दुखणे बाहेर पडले. कर्जाच्या थकबाकींचा डोंगर वाढत गेल्याने बँकेचे आर्थिक कंबरडेच मोडून पडले. या दुखण्याकडे अलिकडच्या संचालक मंडळाने गांभिर्याने पाहिले नाही व प्रशासनातील अधिकाऱ्यांनी मान डोलावून कर्ज प्रकरणांना मान्यता दिली. शहरातील बड्या लोकांनीच कर्जे खिशात घालून बँकेची अक्षरशः लूटमार केली.सर्वसामान्यांच्या ठेवीतील पैसा मनमानीपणे वापरला.अखेर ही बँक शरपंजरी पडली.

संचालक मंडळ बरखास्त करून शासनाने सहकार खात्याचे अधिकारी नागनाथ कंजेरी यांची प्रशासक म्हणून बँकवर नियुक्ती केली. त्यांनी वसुली मोहीम प्रभावीपणे राबवून ठेवीदारांना काही अंशी दिलासा दिला पण बड्या धेंडांनी घेतलेल्या कर्जांची परतफेडच केली नाही. त्यामुळे बँकेने अखेर मान टाकली. एककाळ असा होता की-बँकेकडे ठेवीदारांची रांग असायची पण बँक गॅसवर येताच अधिकाऱ्यांना थकबाकीदारांच्या दारात जाण्याची वेळ आली.

- सोलापूरच्या पूर्व भागात लक्ष्मी ही एक नावाजलेली बँक होती. याच भागात औद्योगिक बँक व सोलापूर नागरी औद्योगिक बँक अशा दोन बँका होत्या. त्या संचालकांच्या खाबुगिरीने बंद पडल्या. आता बंद पडणारी ही लक्ष्मी ही तिसरी बँक ठरेल.

- लक्ष्मी बँकेची स्थापना ६ जून १९२९ रोजी सोलापुरात काही यशस्वी वकिलांच्या योगदानाने झाली. ज्यामध्ये अधिवक्ता कै.गणेश दादाजी पुंडे, अधिवक्ता एस.एन.जमादार, डॉ.के.बी.अंत्रोळीकर यांचा सक्रिय सहभाग होता. लक्ष्मी ही पैशाची देवता आहे, असे म्हटले जाते, प्रत्येक धर्माची देवावर श्रद्धा आहे. या कारणास्तव बँकेचे नाव लक्ष्मी असे ठेवण्यात आले आहे. बॉम्बे को-ऑपरेटिव्ह सोसायटी कायद्याद्वारे दिनांक ६ जून १९२९ रोजी याची यशस्वीपणे नोंदणी झाली. अधिवक्ता कै.गणेश दादाजी पुंडे हे बँकेचे पहिले अध्यक्ष झाले.सर्वसामान्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याच्या उद्देशाने सामाजिक कारणासाठी बांधील असलेल्या सदस्यांच्या गटाने ही बँक उभी केली.या बँकेने २०१२-१५ च्या सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी सोलापूरमधील सर्व सहकारी बँकांमध्ये ठेवींचा विक्रम करून विशेष पारितोषिक मिळवले होते.